# MAHARASHTRA FILM, STAGE & CULTURAL DEVELOPMENT CORPORATION LIMITED

(A Government of Maharashtra Undertaking)

**Dadasaheb Phalke Chitranagari**

Filmcity, Mumbai

https://filmcitymumbai.org

## महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळाच्या वतीने चित्रमहर्षी दादासाहेब फाळके यांची 153 वी जयंती उत्साहात साजरी

..........................

## व्यवस्थापकीय संचालक डॉ. अविनाश ढाकणे यांनी चित्रमहर्षी दादासाहेब फाळके यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले

..................

मुंबई दि.30: भारतीय चित्रपटाचे जनक, चित्रमहर्षी दादासाहेब फाळके यांची 153 वी जयंती महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळाच्या वतीने दादासाहेब फाळके चित्रनगरी गोरेगाव (पूर्व) येथे मोठया उत्साहात साजरी करण्यात आली.

महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. अविनाश ढाकणे यांनी चित्रमहर्षी दादासाहेब फाळके यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. तसेच समोयोचित विचारही व्यक्त केले.  यावेळी सहव्यवस्थापकीय संचालक कुमार खैरे, मुख्य प्रशासकीय अधिकारी विजय भालेराव तसेच दादासाहेब फाळके यांचे कुटुंबीय, चित्रनगरी परिसरात चित्रित होत असलेल्या विविध सिनेमा, मालिकेतील कलाकार, सिनेजगतातील मान्यवर मंडळी, महामंडळाचे वरिष्ठ अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.

धुंडिराज गोविंद फाळके ऊर्फ दादासाहेब फाळके हे चित्रपटनिर्मिती करणारे महाराष्ट्रातील व भारतातील पहिली व्यक्ती होते आणि यासाठीच त्यांना भारतीय चित्रपटांचा जनक मानले जाते . १९१३ साली त्यांनी निर्माण केलेला राजा हरिश्चंद्र

हा मूक चित्रपट मराठी व भारतीय चित्रपटसृष्टीच्या इतिहासातील आद्य चित्रपट होय. १९३७ पर्यंतच्या आपल्या १९ वर्षांच्या कारकिर्दीत त्यांनी ९५ चित्रपटांची व २६ लघुपटांची निर्मिती केली.





**MAHARASHTRA FILM, STAGE & CULTURAL DEVELOPMENT CORPORATION LIMITED**

(A Government of Maharashtra Undertaking)

**Dadasaheb Phalke Chitranagari**

Filmcity, Mumbai

https://filmcitymumbai.org


...................

जनसंपर्क विभाग

महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ मर्या, गोरेगाव (पूर्व)

संपर्क - 022 28401504

दिनांक : 30/04/2023

--------------------------------

**Official social media handle's *:**

Instagram: https://www.instagram.com/filmcitymumbai_/

Facebook: https://www.facebook.com/profile.php?id=100087797359629

Twitter: https://twitter.com/filmcitymumbai_

Youtube: https://youtube.com/@FilmCityMumbai-MFSCDCL